**प्रेसनोट** **दिनांक ०६/०७/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

### तडीपार आदेशाचे उल्लंघन करणारे तडीपार गुंडास समर्थ पोलीसांनी घेतले ताब्यात.

आज दिनांक ६/७/२०१९ रोजी समर्थ पोलीस ठाणे पुणे येथील पोलीस शिपाई हेमंत पेरणे आणि पोशि.सुर्यवंशी हे समर्थ पोस्टे हद्दीत गस्त फिरत होते. पोलीस शिपाई हेमंत पेरणे यांना बातमी मिळाली की , समर्थ पोस्टे अभिलेखावरील गुंड इसम - सागर श्रीकांत पवार रा. १३६, सदानदनगर, मंगळवार पेठ पुणे यास पोलीस उप आयुक्त , परिमंडळ - २ पुणे यांनी त्यांचेकडील आदेश क्र. १५/२०१८ नुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम क.५६(१)(अ)(ब) अन्वये दिनांक १२/९/२०१८ रोजी पुणे शहर व जिल्हयातून दोन वर्षाकरीता तडीपार केलेले असून तो सदानंदनगर येथे स्थानिक रहिवाशी हर्षल पवार यास भेटणेसाठी आलेला आहे . त्यांनी त्वरेने हालचाल करुन १२-४० वा. सदर ठिकाणी जाऊन तडीपार इसम सागर श्रीकांत पवार यास ताब्यात घेऊन त्याने तडीपार मुदतीत परत येण्याची परवानगी घेतलेली आहे काय याची खात्री केली. तेव्हा त्याने कसलीही परवानगी न घेता तडीपार आदेशाचा उल्लंघन करुन आलेला असताना मिळून आला . म्हणून त्याचे विरुध्द पोलीस शिपाई हेमंत पेरणे यांनी महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम १४२ अन्वये सरकारतर्फे फिर्याद नोंद करुन समर्थ पोलीस ठाणे पुणे गुन्हारजि. नोंद क्र. २०२/२०१९ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयात नमूद तडीपार गुंडास पोहवा. सुशील लोणकर समर्थ पोस्टे यांनी अटक केलेली आहे.